श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान संचलित

# श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय

स्थापना : १९८३

नळदुर्ग रोड,तुळजापूर - ४१३६०१. जि. उस्मानाबाद

क मानांकीत 'ब'वर्ग

अ.भा.तं.शि.प.नवी दिल्लीची मान्यता - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेर जि. रायगड शी संलग्नीत

फोन :०२४७१-२४३६०३,e-mail : stbcet@gmail.com website : www.stbcet.org.in

जा.क्र./श्रीतुभअम/ विद्यार्थी/2023/ 1204 दिनांक : 25 /07/2023

## परिपत्रक

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठ नियमानुसार प्रत्येक सत्रामध्ये प्रत्येक विषयामध्ये 75 टक्के उपस्थिती असणे अनिवार्य आहे. त्यापेक्षा कमी उपस्थिती असणा-या विद्यार्थ्यांचे सत्र मान्य (Term Grant) केले जाणार नाही, त्यांचे सबमिशन घेतले जाणार नाही व त्यांना विद्यापीठ परीक्षेसही बसू दिले जाणार नाही. 10 टक्के विशेष हजेरी माफीबाबत वैद्यकीय कारणास्तव, विद्यापीठ/ राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रिडा स्पर्धेमध्ये सहभाग, सेमिनार, वर्कशॉप इ. साठीची उपस्थिती प्राचार्य मा.जिल्हाधिकारी महोदयांकडे शिफारस करतील व त्यांचे मान्यतेनंतर संबंधीत विद्यार्थ्यांचे सत्र मान्य करणेत येईल.

जे विद्यार्थी आजारी असतील किंवा काही वैद्यकीय कारणामूळे महाविद्यालयात एक आठवडयापेक्षा जास्त मुदतीसाठी गैरहजर रहाणार असल्यास संबंधीत विद्यार्थ्याने जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे प्रमाणपत्र घेणे करीता आजारी पडल्यानंतर 15 दिवसाचे आंत संबंधीत विद्यार्थी /पालक यांनी महाविद्यालयात येवून प्राचार्यांचे मार्फत जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडे प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव सादर करावा व या कारणास्तव विभागप्रमुखांची रितसर पूर्व परवानगी घ्यावी व वैद्यकीय उपचारानंतर महाविद्यालयात रुजू होताना जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडून फिटनेस प्रमाणपत्र प्राप्त करुन महाविद्यालयास सादर करणे बंधनकारक आहे व ही सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी /पालक यांची राहील. अन्यथा अशा विद्यार्थ्यांची वैद्यकीय कारणाची अनुपस्थिती ग्राहय धरली जाणार नाही. 15 दिवसानंतर विद्यार्थी / पालक येवून वैद्यकीय प्रमाणपत्रासाठी जिल्हा शल्य चिकीत्सांकडे प्राचार्यांकडून शिफारसीची मागणी करीत असल्यास त्यांची मागणी विचारात घेतली जाणार नाही. या नियमाचे पालन न करणा-या विद्यार्थ्यांची गैरहजेरी वैद्यकीय कारणास्तव ग्राहय धरली जाणार नाही.

शैक्षणिक सत्रातील अनुपस्थिती विशेष कारणास्तव - विद्यार्थ्यांच्या दीर्घ मुदतीचा आजार / कौटुंबिक आपत्ती यामूळे 40 टक्क्यांपर्यंतच मान्य करण्यात येईल. दीर्घ आजार /कौटुंबिक आपत्ती याबाबतची संबंधीत कागदपत्रे स्वसाक्षांकित करुन व याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

उपरोक्त विषयासंबंधी महाविद्यालयाचे हमीपत्र विद्यार्थी व पालक यांनी प्रवेशावेळी संबंधीत विभागप्रमुख यांचेकडे सादर करणे अनिवार्य आहे. जे विद्यार्थी सदर हमीपत्र सादर करणार नाहीत त्यांचे शैक्षणिक सत्र मान्य केले जाणार नाही.

जिल्हाधिकारी, उस्मानाबाद तथा अध्यक्ष
श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर

जिल्हाधिकारी, उस्मानाबाद
तथा अध्यक्ष
श्री.तु.भ.अभि.महाविद्यालय,तुळजापूर

प्रत माहितीस्तव :
जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रुग्णालय - उस्मानाबाद